दूरध्वनी: २५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**महानगरपालिका भवन डॉ. अल्मेडा रोड, पाचपाखाडी, ठाणे - ४००६०२**

संदर्भ क्र./ठामपा/वृप्रा/वृअ-१४६२ दिनांकः ३०/११/२०१८

वृक्षप्राधिकरण

जाहिर सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८ (३ क) अन्वये या जाहीर सूचनेद्वारे सुचित करण्यात येते की, ठाणे महानगरपालिकेच्या हद्दितील अर्जदार निहाय खालील नमुद वृक्ष तोडणे/ पुनर्रोपण करणेकरीता प्राप्त अर्जावर वृक्षप्राधिकरणामार्फत कायद्यातील तरतुदीनूसार निर्णय घेण्यात येणार आहे. या संबंधात काही हरकत/आक्षेप/सूचना असल्यास सदर सूचना लेखी स्वरुपात ठाणे महानगरपालिका नागरी सुविधा केंद्र, तळ मजला, प्रशासकीय भवन, डॉ.अल्मेडा रोड, पाचपाखाडी, ठाणे (प.) येथे जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या मुदतीत दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती सूचनांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर सुचना मा. मुंबई उच्च न्यायालय जनहित याचिका क्र. ११९/२०१७ च्या अंतरिम आदेशातील अटी व शर्तीस अधिन राहुन देण्यात येत आहे.

| अ.क्र | अर्जदार | विषय |
|---|---|---|
| १ | मा. कार्यकारी अभियंता, मलनिस्सारण विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे. | मा.कार्यकारी अभियंता, मलनिस्सारण विभाग यांच्या अर्जानुसार माजिवाडा-मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत एव्हरेस्ट कॉम्प्लेक्स, कोलशेत, ठाणे. येथे मलप्रक्रिया केंद्राच्या बांधकामात बाधित ०१ वृक्ष पुनर्रोपण करणे बाबत. |
| २. | मे. मेट्रो वेस्ट हँडलिंग प्रा. लि., मौजे डायघर, कल्याण शिळ रोड, कल्याण फाटा, ठाणे. | मे. मेट्रो वेस्ट हँडलिंग प्रा. लि., मौजे डायघर, कल्याण शिळ रोड, कल्याण फाटा, ठाणे यांच्या अर्जानुसार मौजे डायघर, कल्याण शिळ रोड, कल्याण फाटा, ठाणे येथे बांधकामात बाधित ०२ वृक्ष पुनर्रोपण करणे बाबत. |
| ३ | मा. कार्यकारी अभियंता, मलनिस्सारण विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे. | मा.कार्यकारी अभियंता, मलनिस्सारण विभाग यांच्या अर्जानुसार माजिवाडा-मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत राममंदीर तलावालगत असलेल्या सुविधा भुखंड, कासारवडवली, ठाणे येथे उदंचन केंद्राच्या खोदकामामध्ये बाधित ०३ वृक्ष तोडणे व ०३ वृक्ष पुनर्रोपण करणे बाबत. |

(डॉ. अनुराधा बाबर)
सहाय्यक आयुक्त तथा वृक्षअधिकारी
ठाणे महानगरपालिका, ठाणे.